


# युवा महोत्सव[...] तरुणाईचा [...]


लोकनृत्याने आणली जान


रंगली वाद्यवृंदांची जुगलबंदी


पथनाट्यातून सामाजिक प्रश्नांवर भाष्य

यावर्षीचा जिल्हास्तरीय युवा महोत्सव कुंडल येथे पार पडला. जिल्ह्यातील सर्व कॉलेजमधील तरुणाईची मांदियाळी कुंडलमध्ये जमली होती. क्रांतिअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालयामध्ये तरुणाईचा मेळा पहावयास मिळाला. सारी तरुणाई युवा महोत्सवात झिंगाट होवून नाचत होती. कोणी आपल्या ग्रुपला चिअरअप करीत होतं... तर कोणी दुसऱ्या ग्रुपचा परफार्मन्स कसा होतो हे अगदी चोरट्या नजरेने पहात होता.

युवा महोत्सवाच्या उद्‌घाटनापासूनच वाद्यवृंद, लोकनृत्य, लोककला या इव्हेंट्सनी अगदी क्रांतिअग्रणी जी.डी.बापू लाड मंचावरच्या विद्यापिठाच्या मान्यवरांना सुद्धा एकाच खुर्चीवर खिळवून ठेवले. तर समूहगीत, लघुनाटिका, मूकनाट्य या इव्हेंट्सनी क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी मंचावरील तरुणाईला विचार करण्यास भाग पाडले. तर एकांकिका, सुगम गायन, वक्तृत्व, वादविवादाने रंगत आणली. पथनाट्याच्या माध्यमातून मांडण्यात आलेल्या आक्रोशाला रस्त्यावरील सर्वांना थबकवले.

प्रत्येक युवा महोत्सवात एक वेगळी काहीतरी झलक पहावयास मिळते. तसेच याही महोत्सवात पहावयास मिळाले ते म्हणजे नुकत्याच घडलेल्या कोपर्डी येथील अल्पवयीन मुलीवरील अत्याचाराचे. इस्लामपूर येथील कुसूमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी असे काही विदारक चित्र रंगवले की[...] असलेल्या तरुण आणि त[...] आले. हागणदारीमुक्तीबा[...] लघुनाटिकेने तरुणांमध्ये [...] महाड येथे नुकत्याच घड[...]

## लावणीवर शिट्ट्या अन् टाळ्या...

महोत्सवात सादर झालेल्या लावणीवर संपूर्ण तरुणाई झिंगाटली होती. भिंगरी फिरावी तशी कॉलेजच्या तरुणी लावणीवर फिरत होत्या. मग काय पोरांच्या नुसत शिट्ट्याच शिट्या... शेवटच्या टप्प्यात लोककला इव्हेंटमध्ये कुंडलमध्ये जमलेल्या साऱ्या तरुणाईने देहभान विसरून ठेका धरला होता.


लावणीवर शिट्ट्या [...]


धांगड्यांने आणली धमाल

तरुण भारत 2/11/16

# क्रांतीअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयात पुस्तक प्रदर्शन

कुंडल : कुंडल (ता.पलूस) येथील क्रांतीअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालयामध्ये वाचन प्रेरणा दिन साजरा करणेत आला. यावेळी पुस्तक प्रदर्शन वाचना संबंधी चर्चासत्राचे आयोजन करणेत आले होते. भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दूल कलाम यांच्या जयंती निमित्त चर्चासत्राचे आयोजन करणेत आले होते. या चर्चासत्रामध्ये स्वागत व प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.व्ही.आर.माने यांनी केले. यावेळी सागर जाधव, काजल ढाकणे, श्वेता थोरबोले या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले तसेच वाचनासंबंधी विचार व्यक्त करून प्रश्न उपस्थित केले. यावेळी प्राचार्य डॉ.के.एम.नलावडे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तर ग्रंथपाल के.एन.देसाई यांनी